फोन नं.२६४७ ४८९२
टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. २/विकामुं/तंशि/आस्था-२/२०२२/ ९३० दिनांक : 28 FEB 2022

## कार्यालयीन आदेश :

पहा : १. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र.जीईसी ३३९६/(७३७६)/तांशि-१, दि.१०.४.१९९७.
२. शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६.
३. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ए/१६-ब, दि.२९.१२.२०१७
४. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.४६७ए/१६-ब, दि.११.१०.२०१८
५. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२ दि.१.८.२०१९
६. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.७.५.२०२१
७. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्रं.२/विकामुं/तंशि/आस्था(३)/२०२१/४०३७, दि. २३.१२.२०२१.

उपरोक्त क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन तसेच वरील संदर्भ क्र.३ व ४ मध्ये पदोन्नतीबाबत नमुद नियमांस अनुसरुन विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई हे संदर्भिय शासन निर्णयानुसार खाली नमूद केलेल्या ग्रामिण संवर्गातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या संस्थेत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती करीत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व सद्यस्थितीत कार्यरत कार्यालय/ संस्थेचे नांव | पदोन्नतीचे पदनाम | पदोन्नतीने नियुक्ती केलेल्या संस्थेचे नांव | अभिप्राय/ संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. गजानन बालाजी पेचफुले<br>लिपिक टंकलेखक,<br>शासकीय तंत्रनिकेतन पेण<br>(वेतनसंरचना एस-६ १९९००-६३२००) | **वरिष्ठ लिपिक**<br>(वेतनसंरचना एस-८ २५५००-८११००) | शासकीय तंत्रनिकेतन विक्रमगड येथे **रिक्त** होणा-या पदावर | **सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती (ग्रामिण संवर्ग)** |
| २. | श्री. नितिन भगवान लवटे<br>लिपिक टंकलेखक,<br>शासकीय तंत्रनिकेतन ठाणे<br>(वेतनसंरचना एस-६ १९९००-६३२००) | **वरिष्ठ लिपिक**<br>(वेतनसंरचना एस-८ २५५००-८११००) | शासकीय तंत्रनिकेतन मालवण येथिल **रिक्त** पदावर | **सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती (ग्रामिण संवर्ग)** |
| ३. | श्री. केदार मनोहर लोंढे<br>लिपिक टंकलेखक,<br>शासकीय तंत्रनिकेतन ठाणे<br>(वेतनसंरचना एस-६ १९९००-६३२००) | **वरिष्ठ लिपिक**<br>(वेतनसंरचना एस-८ २५५००-८११००) | शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथिल **रिक्त** पदावर | **सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती (ग्रामिण संवर्ग)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. किशोर गणपत कांबळे<br>लिपिक टंकलेखक,<br>शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी<br>(वेतनसंरचना एस-६ १९९००-६३२००) | **वरिष्ठ लिपिक**<br>(वेतनसंरचना एस-८<br>२५५००-८११००) | शासकीय तंत्रनिकेतन<br>रत्नागिरी येथे **रिक्त**<br>होणा-या पदावर | **सेवाजेष्ठतेनुसार<br>पदोन्नती<br>(ग्रामिण संवर्ग)** |

उपरोक्त पदोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

४. सदरच्या पदोन्नत्या हया राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहेत.

५. सदरची पदोन्नतीचे आदेश संस्थेने या कार्यालयाकडे उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे, विविध सेवा जेष्ठता / शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्गमित केलेले आहेत. परंतु समितीच्या बैठकीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संदिग्ध माहितीमुळे किंवा माहितीच्या विश्लेषणात्मक आकलनातील संदिग्धतेमुळे चुकीने पदोन्नतीचे लाभ मिळाल्याचे / करण्यात आल्याचे कोणत्याही वेळी निदर्शनास आल्यास देण्यात आलेला पदोन्नतीचा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने काढून घेण्यात येतील या अटीवर देण्यात येत आहे.

६. उपरोक्त कर्मचा-यांस जर बारा वर्ष सेवेच्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देऊन वरीष्ठ पदाच्या वेतनश्रेणीत वेतननिश्चितीचा फायदा देण्यात आला असेल तर त्यांची पदोन्नतीच्या पदावर पुन्हा वेतननिश्चिती करण्यात येणार नाही.

४. पदोन्नतीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत हजर होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना पदोन्नतीत स्वारस्य नाही असे समजून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी नंतरच्या कर्मचाऱ्याचा विचार केला जाईल.

५. उपरोक्त कर्मचा-यांने पदोन्नती नाकारल्यास संदर्भाधीन दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदी बंधनकारक राहतील.

वरील अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर हजर होतांना वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी हमीपत्र लिहून देणे बंधनकारक राहिल.

**(प्रमोद अं. नाईक),**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई- ५१.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

१.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.
२.कोषागार / उपकोषागार अधिकारी, ठाणे/पेण/रत्नागिरी/विक्रमगड/मालवण (मानार्थ) (संस्थाप्रमुखांमार्फत)
३.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,ठाणे/पेण/रत्नागिरी/मालवण/विक्रमगड
४.संबंधीत कर्मचारी (संस्थाप्रमुखांमार्फत)
५.निवड नस्ती.